# **<u>सुंदर आयुष्य</u>**

आपल्या अपेक्षेप्रमाणे सारं असतं
सगळं काही अगदी हवं तसं असतं
यामुळे आयुष्य फार सुंदर सोपं होतं...

काळाला चांगले वाईट समजत नाही
निसर्ग कशातही भेदभाव करत नाही
ह्यामुळेच आयुष्य फार सुंदर सोपं होतं...

मनातील अशब्द स्वप्नात अवतरतं
स्वप्नातलं सारं अस्तित्वात उतरतं
म्हणूनच आयुष्य फार सुंदर सोपं होतं...

नात्यातील प्रेम शब्दाबाहेर असतं
प्रेमातील कर्तव्य सीमाहीन असतं
म्हणूनच आयुष्य फार सुंदर सोपं होतं...